आकाशवाणी नागपूर,

प्रादेशिक वृत्त विभाग

प्रादेशिक बातम्या (मराठी - वेळ सायंकाळी ६.४०)

मंगळवार, दिनांक ०२ मार्च २०२१

आकाशवाणी नागपूर

काही ठळक बातम्या...

1. अमरावती विमानतळासाठी साडेसहा कोटी रूपयांच्या निधीला मंजूरी.
2. दहावी आणि बारावीच्या परीक्षांचं अंतिम वेळापत्रक जाहीर.
3. नागनदीच्या प्रदूषण निर्मूलन प्रकल्पासाठी निधी मंजूर.

आणि

4. नागपूरला वैभवशाली इतिहास असल्याचा सार्थ अभिमान माहपौर दयाशंकर तिवारी.

विमानतळ

अमरावती येथील विमानतळाचे काम वेगाने होण्यासाठी निधी उपलब्ध व्हावा म्हणून राज्याच्या महिला आणि बालविकास मंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री ॲड. यशोमती ठाकूर यांनी केलेल्या पाठपुराव्याला यश मिळाले असून, अमरावती विमानतळासाठी ६ कोटी ४५ लक्ष रूपयांचा निधी वितरीत करण्याचा निर्णय सामान्य प्रशासन विभागाकडून निर्गमित झाला आहे. जिल्ह्याच्या विकासात महत्वपूर्ण ठरणाऱ्या अमरावती विमानतळाच्या कामासाठी शासनाने निधी उपलब्ध करून दिला आहे. आता विमानतळाचे काम गतीने पूर्ण होईल, असा विश्वास पालकमंत्री ठाकूर यांनी व्यक्त केला. अमरावती जिल्ह्यातील वस्त्रोद्योग पार्क आणि त्यानुषंगाने औद्योगिक विकासाच्या मोठ्या शक्यता पाहता विमानतळ लवकरात लवकर पूर्ण होणे गरजेचे आहे. येथील उद्योगवाढीसाठीही पालकमंत्र्यांकडून पाठपुरावा आणि प्रयत्न होत आहेत. मेक इन महाराष्ट्रअंतर्गत नवे उद्योगही अमरावतीत उभारले जाणार आहेत. या पार्श्वभूमीवर विमानतळाची आवश्यकता आहे. निधी उपलब्ध झाल्याने अमरावती विमानतळाचे काम लवकरच गती घेईल. अमरावतीच्या बेलोरा विमानतळाच्या विकासाचे काम महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीतर्फे होत आहे. विमानतळाचा अमरावती शहर आणि जिल्ह्याच्या विकासासाठी आणि येथील व्यापार-व्यवसाय, उद्योगवाढीच्या दृष्टीने लाभ होणार आहे. शासनाकडून प्राधिकरणाला निधी प्राप्त झाल्याने आता धावपट्टी, संरक्षण भिंत आदी कामांना गती मिळेल, असे कंपनीचे वरिष्ठ व्यवस्थापक गौरव उपशाम यांनी सांगितले.

विधानसभा-शिंदे

यवतमाळ जिल्ह्यातील आर्णी नगरपरिषदेमध्ये मान्सूनपूर्व कामात झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी आठ दिवसाच्या आत पूर्ण करून चौकशीत आढळणाऱ्या दोषींवर कठोर कारवाई करु, असे नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानसभेत सांगितले. सदस्य डॉ. संदीप धुर्वे यांनी

यासंदर्भात प्रश्न उपस्थित केला होता. त्याला उत्तर देताना शिंदे म्हणाले, या प्रकरणी जिल्हाधिकाऱ्यांनी तहसिलदार यांना चौकशी करुन अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले होते. दरम्यान, यवतमाळ जिल्ह्यातील महागांव ते फुलसांगवी रस्त्याचे काम या महिन्याअखेर पूर्ण करण्यात येणार असून, रस्त्याचे काम गुणवत्तेनुसार होण्याकरिता संबंधितांना निर्देश देण्यात आले आहेत, अशी माहिती सार्वजनिक बांधकाम मंत्री अशोक चव्हाण यांनी विधानसभेत दिली.

वीज तोडणीला स्थगिती

राज्यात वीज तोडणी मोहिमेला स्थगिती देत असल्याची घोषणा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज विधानसभेत केली. कामकाज सुरु होताच विरोधकांनी वीज बिलाचा मुद्दा उपस्थित करुन गदारोळ केला, त्यावेळी पवार बोलत होते. प्रश्नोत्तराचा तास रद्द करुन वीज प्रश्नी चर्चेची मागणी विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी केली. वीज तोडण्याचा सरकारचा आदेश मागे घेण्याची मागणीही त्यांनी केली. मात्र सभागृहात आज राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा असून, वीज बिलासंदर्भात एक दिवस ठरवून चर्चा करुन निर्णय घेऊ, असं आश्वासन पवार यांनी यावेळी दिलं. जोपर्यंत ऊर्जा विभागाची वाढीव वीज बिलाच्या मुद्द्यावर चर्चा होत नाही, तोपर्यंत शेतकऱ्यांचे, सर्वसामान्य नागरिकांचे वीज जोडणी तोडणं थांबण्यात येईल, असं ते म्हणाले. वीज तोडणी तत्काळ थांबवण्याचे आदेश दिल्याबद्दल फडणवीस यांनी उपमुख्यमंत्र्यांचे आभार मानले.

चंद्रशेखर बावनकुळे

मुंबईमध्ये गत वर्षी १२ ऑक्टोबरला वीज खंडीत झाली होती. यामागे चीनचा सायबर हल्ला कारणीभूत असल्याचे राज्याचे गृहमंत्री अनिल देशमुख आणि उर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. पण या घटनेमागचे कारण वीज वाहीनी खंडीत होणे हेच होते, असा आरोप भाजपचे महामंत्री आणि राज्याचे माजी उर्जामंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केला. या यंत्रणेला सायबर ॲटक होवूच शकत नाही. जर चीनचा संबंध असता तर राज्याने केंद्राकडे हा विषय न्यायचा असता. पण परस्पर एका वृत्तपत्राच्या आधारे अहवालावर विसंबून राज्यातल्या दोन्ही मंत्र्यानी कोणतीही शहानिशा न करता राज्याच्या जनतेला खोटे सांगितले असल्याचं बावणकुळे म्हणाले. ते आज नागपुरात आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते.

टुरीस्ट गाईड

पर्यटनाची आवड असणाऱ्या होतकरु उमेदवारांना पर्यटक मार्गदर्शक प्रशिक्षण देऊन राज्यात एक हजार टुरीस्ट गाईड तयार करण्याची योजना महाराष्ट्र पर्यटन संचालनालयानं आखली आहे. या योजने अंतर्गत राज्यातल्या तरुणांना मोफत ऑनलाईन पर्यटक मार्गदर्शक प्रशिक्षण दिलं जाईल. प्रशिक्षणानंतर महाराष्ट्र शासनाचं टुरीस्ट गाईड म्हणून प्रमाणपत्र दिलं जाईल.

तसंच, पर्यटनस्थळी टुरीस्ट गाईड म्हणून काम करण्याची संधी मिळेल, अशी माहिती पर्यटन संचालक डॉ. धनंजय सावळकर यांनी दिली.

सीबीएसई

सीबीएसई च्या १०वी च्या समाजशास्त्र विषयाच्या परीक्षेसाठीचा अभ्यासक्रम आणखी कमी केला असल्याची माहिती समाजमाध्यमांमधून पसरत असून, ती खोटी असल्याचं सरकारनं स्पष्ट केलं आहे. अभ्यासक्रम आणखी कमी केल्याचं सीबीएसईनं जाहीर केलं नसल्याचं प्रेस इन्फोर्मेशन ब्युरोनं सांगितलं आहे.

परीक्षा वेळापत्रक

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे एप्रिल-मे २०२१ मध्ये घेण्यात येणाऱ्या इयत्ता दहावी आणि बारावीच्या लेखी परीक्षांचे अंतिम वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. बारावीची लेखी परीक्षा सर्व साधारण आणि द्विलक्षी विषय आणि उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम पुनर्रचित आणि जुना अभ्यासक्रम २३ एप्रिल ते २१ मे २०२१ या कालावधीत, तर दहावीची लेखीपरीक्षा २९ एप्रिल ते २० मे या कालावधीत होईल. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर यंदा प्रथमच परीक्षा फेब्रुवारी-मार्च ऐवजी एप्रिल-मे या कालावधीत होणार आहेत. मंडळाच्या संकेतस्थळावरील वेळापत्रकाची सुविधा ही फक्त माहितीसाठी आहे. संकेतस्थळावर २६ फेब्रुवारीपासून उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. परीक्षेपूर्वी शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयात देण्यात येणारे छापील वेळापत्रक अंतिम राहील. शाळा तसेच महाविद्यालयांना दिलेल्या छापील वेळापत्रकावरुन विद्यार्थ्यांनी परीक्षेच्या तारखांची खात्री करुन घ्यावी. सोशल मीडिया, व्हॉट्स ॲप अन्य यंत्रणा किंवा तत्सम माध्यमातून छपाई केलेले वेळापत्रक विद्यार्थ्यांनी ग्राह्य धरू नये. असे प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

आमचा खेळणीचा उद्योग बुटीबोरी एम.आय.डी.सी.मध्ये असून, जवळपास ७० प्रकारचे खेळणी बनवितो. उदाहरणार्थ एज्युकेशनल, बोड गेम्स, पझल्स गेम, स्पोर्ट टाइज् इत्यादी. विजय टाईज् कंपनीने टायफेयर एक्झीबिशनमध्ये भाग घेतला होता. विजय टाइज्ची खेळणी आपल्या नागपूरमध्ये सर्व ठिकाणी उपलब्ध आहे. आपण सर्व आत्मनिर्भर भारत बनविण्यासाठी सहयोग करा. धन्यवाद.

नाग नदी

नागपूर शहरातून वाहणारी नदी नाग नदी जिने या शहराला आपले नाव दिले आहे, ती आता सांडपाणी आणि औद्योगिक कचऱ्यामुळे अत्यंत प्रदूषित झाली आहे. नाग नदी प्रदूषण निर्मुलन प्रकल्पाला दोन हजार ११७ कोटी रुपये खर्च मंजूर झाला आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी आज त्यांच्या कार्यालयात जागतिक बँकेच्या अधिकाऱ्याची, डीजी एनएमसीजी आणि नागपूर

महानगरपालिका आयुक्तांची बैठक घेतली आणि त्यात हा निर्णय घेण्यात आला. राष्ट्रीय नदी संवर्धन योजनेंतर्गत मंजूर केलेला हा प्रकल्प राष्ट्रीय नदी संरक्षण संचालनालय, एनआरसीडी राबवेल. सदर प्रकल्प प्रक्रिया न झालेले सांडपाणी, घनकचरा वाहणारे नाले आणि नाग नदी तसंच त्याच्या उपनद्यांमध्ये वाहणाऱ्या अन्य अशुद्धतेच्या संदर्भातील प्रदूषणाची पातळी कमी करेल.

अपघात

बुलडाणा जिल्ह्यात चिखली-देऊळगाव रस्त्यावर काल संध्याकाळी झालेल्या एका अपघातात दोन जणांचा मृत्यू झाला. चिखलीतल्या अंचरवाडी फाट्याजवळ एका दुचाकीला टिप्परनं धडक दिल्यानं हा अपघात झाला. या अपघातात दुचाकीवरच्या एकाचा घटनास्थळीच, तर दुसऱ्याचा रुग्णालयात मृत्यू झाला. या रस्त्यावर टिप्पर अनियंत्रित वेगानं धावत असल्यानं अनेक अपघात होत असल्याची स्थानिकांची तक्रार असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

काकाजी गांधी निधन

बुलडाणा जिल्हा भाजपचे जेष्ठ नेते, माजी जिल्हाध्यक्ष घनश्यामदासजी उपाख्य काकाजी गांधी यांचे आज पहाटे १२:३० च्या सुमारास निधन झाले. मृत्यूसमयी ते ८४ वर्षांचे होते. संपूर्ण जिल्ह्यात भाजपा वाढवण्यात त्यांचे योगदान होते. सलग १० वर्षे ते भाजपचे जिल्हाध्यक्ष होते.

कांद्याचे भाव

नाशिक जिल्ह्यातल्या प्रमुख बाजारपेठेत गेल्या काही दिवसांपासून कांद्याचे भाव घसरले आहेत. काल आठवड्याच्या पहिल्याच दिवशी मनमाड कृषी उत्पन्न बाजार समितीत कांद्याचे भाव स्थिर होते. बाजार समितीत ४१३ ट्रॅक्टर इतकी कांद्याची आवक झाली. लाल कांद्याला एक हजार ते दोन हजार ५८१ रुपये, तर पांढऱ्या कांद्याला ६४० ते एक हजार ४०० रूपये क्विंटल भाव मिळाला.

इथेनॉल निर्मिती

महाराष्ट्रातल्या साखर कारखान्यांनी उसाच्या रसापासून इथेनॉलची निर्मिती करावी आणि याकामी मराठा चेम्बरनं पुढाकार घ्यावा असं आवाहन केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी केलं आहे. मराठा चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीच्या वतीनं आयोजित आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये ते बोलत होते.

बॉम्ब सदृश्य वस्तू

नाशिक शहरातील कोलेजरोड भागात आज दुपारी एक बॉम्ब सदृश्य वस्तू आढळल्याने खळबळ उडाली. बॉम्ब शोधक आणि नाशक पथकाने तपासून ते निकामी केले त्यामुळे मोठा अनर्थ टळला.

मनपा स्थापना दिन

नागपूर शहराला वैभवशाली इतिहास आहे आणि गौरवशाली परंपरा आहे. नागपूर शहर आता सर्वच बाबतीत पुढे जात असून, जगाच्या नकाशावर झळकू लागले आहे. नागपूर शहराच्या विकासाच्या मार्गात नागपूर महानगरपालिकेची महत्वाची भूमिका आहे. या महानगरपालिकेने राज्याचे आणि देशाला मार्गदर्शक ठरतील असे नेतृत्व दिले आहे, अशा आपल्या नागपूर शहराचा सार्थ अभिमान आहे, असे गौरवोद्गार महापौर दयाशंकर तिवारी यांनी काढले. नागपूर महानगरपालिकेच्या ७०व्या स्थापना दिनानिमित्त महापौर दयाशंकर तिवारी यांनी संबोधित केले. प्रांरभी मनपा मुख्यालयातील हिरवळीवर शहराचे प्रथम महापौर बॅरिस्टर शेषराव वानखेडे यांच्या पुतळ्याला पुष्प अर्पण करून त्यांनी अभिवादन केले. तसेच डॉ. पंजाबराव देशमुख सभागृहात ही त्यांच्या प्रतिमेला माल्यार्पण केले. यावेळी उपमहापौर मनीषा धावडे प्रामुख्याने उपस्थित होत्या. जनप्रतिनिधींच्या योजनेला प्रशासनाची साथ मिळाल्यास त्यामधून मिळणारे फलीत कसे असू शकते, याचे उत्तम उदाहरण हे ठरले आहे, अशी भावनाही महापौर यांनी यावेळी व्यक्त केली.

*******

**The End**